महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२४ वे | दिनांक : २८/०४/२०२६ | वार मंगळवार


## नीलम गोऱ्हेंना पुन्हा उमेदवारी नको : शिवसेना महिला आघाडीचा 'लेटर बॉम्ब'



**पुणे** : महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, निवडणूक आयोगाने या निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केला आहे. या जागांपैकी शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या आणि उपसभापती नीलम गोऱ्हे यांचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने शिवसेनेकडून कुणाला संधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शिवसेना पुणे जिल्हा महिला आघाडीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून नीलम गोऱ्हे यांना पुन्हा उमेदवारी देऊ नये, अशी थेट मागणी केली आहे. या पत्रामुळे पक्षांतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आली असून, उमेदवारीवरून राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

शिवसेना पुणे जिल्हा महिला आघाडीने पाठवलेल्या या पत्रात नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून, त्यांनी पक्ष संघटनेसाठी काम करण्याऐवजी महिला कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्यावरच भर दिल्याचे म्हटले आहे. महिलांचे चारित्र्यहनन करणे आणि त्यांच्यात आपापसात भांडणे लावून संघटनेचे मोठे नुकसान केल्याचा ठपका या पत्रात ठेवण्यात आला आहे. आपल्याला पुन्हा आमदार करण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी शब्द दिला असल्याचा दावा नीलम गोऱ्हे कार्यकर्त्यांकडे करत आहेत, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

पत्रात पुढे असा इशारा देण्यात आला आहे की, नीलम गोऱ्हे यांच्याऐवजी एखाद्या सामान्य शिवसैनिकाला संधी दिल्यास कार्यकर्ते तुमचे स्वागत करतील. अन्यथा उद्धव ठाकरे यांच्याप्रमाणेच तुमचीही एका महिलेने फसवणूक केली, असे म्हणावे लागेल. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आलेल्या या पत्रावर कोणत्याही विशिष्ट पदाधिकाऱ्याचे नाव किंवा दिनांक नसून, ते केवळ 'पुणे जिल्हा शिवसेना महिला आघाडी' या नावाने पाठवण्यात आले आहे. या निनावी पत्रामुळे आता शिवसेनेच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, विधान परिषदेची एक जागा जिंकण्यासाठी २८ मतांच्या कोट्याची आवश्यकता असून, सध्याचे पक्षीय बलाबल पाहता महायुतीचे पारडे जड असल्याचे दिसून येते. भाजप (१३१ आमदार), शिवसेना शिंदे गट (५७ आमदार) आणि राष्ट्रवादी अजित पवार गट (४० आमदार) अशा एकूण संख्याबळाच्या जोरावर महायुतीचे ८ उमेदवार तांत्रिकदृष्ट्या सहज निवडून येऊ शकतात. याउलट, महाविकास आघाडीकडे ४६ आमदारांचे संख्याबळ असल्याने त्यांचा एक उमेदवार आरामात निवडून येईल. मात्र दुसऱ्या जागेसाठी लागणाऱ्या अतिरिक्त १० मतांची बेरीज करणे महाविकास आघाडीसाठी सध्याच्या राजकीय परिस्थितीत मोठे आव्हान ठरणार आहे.

## विद्यार्थ्यांचे शुल्क ६% व्याजासह परत करा : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



**मुंबई** : राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारावर विद्यार्थ्यांची बाजू न्याय्य ठरवत पुण्यातील एका विद्यालयाला विद्यार्थ्यांकडून वसूल केलेले शुल्क सहा टक्के व्याजासह परत करण्याचे निर्देश दिलेत. विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पुणे येथील आय,एल,एस, विधि महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांकडून करण्यात आलेल्या बेकायदेशीर शुल्क वसुलीप्रकरणी राज्य शासनाने ही भूमिका घेतली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, पुणे येथील अशासकीय अनुदानित महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून अपारदर्शक पद्धतीने व बेकायदेशीर शुल्क आकारणी करण्यात आल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उच्च शिक्षण विभागाने सह संचालक (उच्च शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समितीची स्थापना करून सखोल चौकशी केली.

या चौकशीअंती सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, संबंधित महाविद्यालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 101 (7) च्या तरतुदींचे उल्लंघन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची पूर्वमान्यता न घेता शैक्षणिक वर्ष 2020 - 21, 2021 - 22 व 2024 - 25 दरम्यान विद्यार्थ्यांकडून अनधिकृत शुल्क वसूल केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. 17 विविध शीर्षकांखाली एकूण 1,04,863/- रुपये इतकी रक्कम बेकायदेशीररित्या वसूल करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयाद्वारे संबंधित महाविद्यालयास ही रक्कम फी भरल्याच्या दिनांकापासून सहा टक्के व्याजदराने संबंधित विद्यार्थ्यांना परत करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

राज्यातील इतर महाविद्यालयांमध्येही विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी होत असल्यास त्याची शहानिशा करून अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण आणि महाविद्यालयांमधील शुल्क निर्धारण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

## आठवडी बाजार बंद करून भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव : अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर** : महानगरपालिकेने शहरातील पारंपरिक आठवडी बाजार बंद करण्याचा घेतलेला निर्णय सर्वसामान्यांच्या पोटावर लाथ मारणारा आहे. आठवडी बाजार बंद करून संबंधित भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचा भाजपचा डाव असल्याचा आरोप करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज शहानुरवाडी येथे तीव्र निदर्शने केली. हा निर्णय रद्द करून गरिबांचा रोजगार वाचवावा, या मागणीसाठी 'चला रे चला... बाजाराला चला' असे आंदोलन करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगरमधील चिकलठाणा, जाफर गेट आणि शहानूरमियाँ दर्गा (पीर बाजार) येथील ऐतिहासिक आठवडी बाजार कायमचे बंद करण्याची घोषणा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या भागात सध्या भाजीपाला मंडईची महापालिकेची कसलिही योजना नाही. तत्पूर्वीच हे बाजार आता बंद केले जाणार आहेत. या निर्णयाविरोधात आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शहानुरवाडी येथील आठवडी बाजारात तीव्र आंदोलन करत निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून भाजीपाला खरेदी केला.

आंदोलनाचे नेतृत्व करताना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सत्ताधारी भाजपवर कडक शब्दांत टीका केली. ते म्हणाले की, "मागील काही दिवसांपासून भाजपची सत्ता संभाजीनगर महापालिकेत आहे. तेव्हापासून भाजपचे पदाधिकारी आणि त्यांचे संभाजीनगरमधील नेते हे सर्वसामान्य जनतेच्या पोटावर कशा पद्धतीने पाय द्यायचा अशी भूमिका घेतली आहे. बिल्डर धार्जिणे धोरण त्यांचे सुरू झालेले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सोमवारचा बाजार हा परंपरागत आहे. कित्येक वर्षांपासून तो सुरू आहे. 30 ते 35 वर्षांपासून हा बाजार भरत असल्याचे मी पाहत आलोय. छत्रपती संभाजीनगर शहरात भाजी बाजार उपलब्ध नाही. महानगरपालिकेचे त्याकडे पूर्ण दुर्लक्ष आहे. शहरात सध्या सुरू असलेले बाजार बंद करून, हे भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव भाजपचा आहे. त्याला आम्ही विरोध करत आहोत. त्यासाठी आम्ही आज चला रे चला... बाजाराला चला... असे आंदोलन करण्याची भूमिका घेतलेली आहे."याप्रसंगी शिवसेना उपनेते सुभाष पाटील, उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर,शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, विधानसभाप्रमुख प्रमोद ठेंगडे, विधानसभा संघटक गिरीश चपळगांवकर, वीरभद्र गादगे, महिला आघाडी संपर्क संघटक सुनीता आऊलवार, सहसंपर्क संघटक अनिता मंत्री, जिल्हा संघटक आशा दातार, महानगर संघटक सुकन्या भोसले व विधानसभा संघटक मीरा देशपांडे उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ एप्रिल २०२६


## नामदार मेघना दिदी बोर्डीकर यांच्या पुढाकारातून चारठाण्याला मिळणार अप्पर तहसील कार्यालय



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** ना.मेघनादी बोर्डीकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने घेतली महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची भेट.जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालयाची मंजुरी मिळविण्यासाठी चारठाणा येथील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री नामदार मेघना दिदी बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय मुंबई येथे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची भेट घेतली व चारठाणा येथे अप्पर तहसील ची मंजुरी देण्याची विनंती केली.भेटी दरम्यान शिष्टमंडळाने महसुल मंत्री बावनकुळे यांना चारठाणा महसूल मंडळाचे महत्वपूर्ण सामाजिक, भौगोलिक व निजामकालीन जुने परगणा असलेले महसुली दस्तावेज सादर केले. पालकमंत्री नामदार मेघना दिदी बोर्डीकर यांनी आग्रही भूमिका घेत चारठाण्याचे भौगोलिक क्षेत्राचे महत्व महसूल मंत्र्यांच्या निदर्शनास आणुन दिले. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांनी शिष्टमंडळासोबत सकारात्मक चर्चा केली व जिल्हाधिकारी परभणी व महसूल अप्पर सचिव श्री. विकास खारगे यांना परिपूर्ण प्रस्ताव स्वीकारून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले व चारठाणा येथे लवकरच अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्याचे स्पष्ट संकेत दिले.

यावेळी चारठाणा येथील शिष्टमंडळात भाजपा नेते नानासाहेब राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी, दिपक भाग्यवंत, संदीप देशमुख, साबेर पठाण आदीची उपस्थिती होती.

## कर्तव्यदक्ष पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावे - प्रतीक्षा वासनिक

**अकोला :** संकल्प बहुद्देशीय संस्था अकोला यांच्यातर्फे कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन शेगांव येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील आपल्या कार्यास एकनिष्ठ असणाऱ्या,सामाजिक, पोलीस, सरपंच,कृषी, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक, संस्था, प्रशासकीय, कला व अन्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकांना हा कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा मे महिन्यात शेगांव येथे पार पडणार आहे अशी माहिती कार्यक्रम मुख्य आयोजक प्रतीक्षा वासनिक यांनी दिली. पुरस्कार प्रस्ताव अधिक माहितीसाठी +917385792660 वर सपंर्क करावा असें आवाहन प्रतीक्षा वासनिक यांनी केले आहे.

## "माणुसकी अजून जिवंत आहे" याचे दर्शन घडविणारा तरुण सोमनाथ नीळ

**खुलताबाद :** खुलताबाद तालुक्यातील वेरूळ परिसरात राहणाऱ्या 'सोमनाथ निळ' या तरुणाने सध्याची उन्हाची तीव्रता, वारंवार डोंगराला लागणारी आग, पाण्याची कमतरता यामुळे वन्यजीव प्राण्यांची जीवन जगण्यासाठीची बिकट परिस्थिती लक्षात घेता या सहृदयी तरुणाने स्वप्रयत्नाने पानवठे तयार करून पशुपक्षांसाठी पाण्याची व्यवस्था केली आहेत.वेरूळ परिसरातील मलकापूर येथील आपल्या शेताच्या शेजारी असलेल्या डोंगर व फॉरेस्ट मधील अनेक वन्यजीव प्राण्यांना उन्हाच्या तीव्रतेमुळे तसेच आजूबाजूच्या परिसरात पाण्याचे दुर्भीक्ष असल्यामुळे अनेक छोटे मोठेवन्यजीव कासावीस होऊन बिकट अवस्थेत जीवन जगताना आढळून आले त्यानंतर त्यांनी यासाठी आपल्याला काय करता येईल या विचारातून मागील अनेक वर्षापासून ते प्रयत्न करत आहेत.याही वर्षी स्वतःच्या शेतातील विहीर व बोर मधील असलेले पाणी शेतात कोणतेही पीक न घेता वन्यजीव प्राण्यांसाठी राखून ठेवले वेळोवेळी मोटर चालू करून परिसरात पाणवठ्यांमध्ये पाणी सोडून वन्यजीव प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करतात त्यामुळे परिसरात पाण्याची व्यवस्था झाल्यामुळे उन्हाच्या तीव्रतेपासून वन्य जीवाना थोडासा दिलासा मिळत आल्यामुळे अनेक छोटे मोठे प्राणी, पक्षी परिसरात दिसायला लागले आहेत.

## उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** उन्हाळ्यात तापमानात होणारी वाढ लक्षात घेता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उष्माघातापासून बचावासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.सुरक्षेचे उपाययोजना तहान लागलेली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी ओआरएस (ORS), लस्सी, लिंबू पाणी, ताक आणि कैरीचे पन्हे यांसारख्या घरगुती पेयांचा वापर करावा. बाहेर पडताना हलके, पातळ आणि सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. डोके झाकण्यासाठी छत्री, टोपी किंवा ओल्या कापडाचा वापर करावा. दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे. कष्टाची कामे पहाटेच्या वेळी उरकून घ्यावीत आणि कामाच्या ठिकाणी मध्ये-मध्ये विश्रांती घ्यावी.घर थंड ठेवण्यासाठी पडदे आणि सनशेडचा वापर करावा. रात्रीच्या वेळी खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पाळीव प्राणी आणि गुरांना छावणीत ठेवावे व त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी द्यावे.चक्कर येणे, सतत घाम येणे, डोकेदुखी किंवा अशक्तपणा जाणवल्यास ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. अशा वेळी तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. सावधगिरीच्या सूचना चहा, कॉफी, दारू आणि कार्बोनेटेड थंड पेये घेणे टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या पार्क केलेल्या वाहनात सोडू नका. तापमान जास्त असताना कष्टाची कामे टाळावीत. उन्हाच्या तीव्र कालावधीत स्वयंपाक करणे टाळावे आणि स्वयंपाकघरात हवेशीर वातावरण ठेवावे.जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अधिक माहितीसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या सोशल मीडिया हँडलला (@SDMAMaharashtra) भेट द्यावी किंवा जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावरील सूचनांचे पालन करावे. स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा उष्माघातापासून बचाव करण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ एप्रिल २०२६

## शिकाऊ डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे ४ महिन्यांच्या बाळाचा करुण अंत

**मुंबई** : सरकारी असो किंवा खासगी, आजकाल रुग्णालयांमध्ये माणुसकी आणि संवेदना हरवत चालल्याचे विदारक चित्र वारंवार समोर येत आहे. अशाच एका संतापजनक घटनेत, मुंबईतील प्रसिद्ध वाडिया हॉस्पिटलमधील शिकाऊ डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका चार महिन्यांच्या निष्पाप बाळाला आपला जीव गमवावा लागल्याचा गंभीर आरोप त्याच्या आईने केला आहे. डॉक्टरांच्या बेजबाबदारपणामुळे घडलेल्या या प्रकारामुळे रुग्णालय प्रशासनाविरुद्ध नातेवाईकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोग्य यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आपल्या बाळाला न्याय मिळावा यासाठी पीडित कुटुंबीयांनी आता कायदेशीर लढा पुकारला असून, १५ एप्रिल रोजी मुंबईतील भोईवाडा पोलिस ठाण्यात संबंधित डॉक्टरांविरोधात तक्रार अर्ज दाखल केला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, त्यांनी केवळ पोलिसांकडेच नव्हे तर राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि पोलिस आयुक्त यांच्याकडेही पत्रव्यवहार करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या या मातेचा आक्रोश मन हेलावून टाकणारा असून, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

अंबरनाथ येथील पालेगावमधील रहिवासी अर्चना पाटील यांचा मुलगा शिवांश याला सर्दी-तापाचा त्रास जाणवत असल्याने सुरुवातीला कल्याणमधील एका खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी बाळाच्या छातीत कफ असल्याचे सांगत वाडिया हॉस्पिटलला जाण्याचा सल्ला दिला. मात्र, वाडिया रुग्णालय प्रशासनाने पहिल्या भेटीत बाळाला दाखल करून न घेता, केवळ औषधे देऊन आणि त्याला 'टीबी' असल्याचे निदान करून घरी पाठवले. २९ मार्च रोजी बाळाची प्रकृती पुन्हा बिघडल्याने पाटील कुटुंबाने त्याला तातडीने वाडिया रुग्णालयात नेले. विशेष म्हणजे रुग्णालयापर्यंत पोहोचेपर्यंत बाळ खेळत होते, मात्र तिथे दाखल होताच पुढील २४ तासांत बाळाची स्थिती बदलली.

बाळाच्या आईने केलेल्या खळबळजनक आरोपानुसार, मुख्य डॉक्टरांच्या अनुपस्थितीत केवळ नर्स आणि शिकाऊ डॉक्टरांनीच शिवांशवर उपचार केले. पालकांच्या मते, कोणतीही पूर्वकल्पना न देता बाळाच्या डोक्याचे व पोटाचे ऑपरेशन करण्यात आले आणि त्याच्या शरीरात विविध ठिकाणी नळ्या टाकून दररोज टाळूतून रक्त काढले जात होते. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, ज्या व्हेंटिलेटरवर बाळाला ठेवले होते, त्यात दोन वेळा शॉर्ट सर्किट होऊन ऑक्सिजन पुरवठा खंडित झाला होता. केवळ शिकाऊ डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आणि यंत्रणेच्या बिघाडामुळे आपल्या बाळाचा जीव धोक्यात आल्याचा गंभीर आरोप अर्चना पाटील यांनी केला आहे.

तब्बल १३ दिवस अर्चना पाटील यांचे बाळ आयसीयूत मृत्यूशी झुंज देत होते, मात्र या संपूर्ण काळात त्याने एकदाही डोळे उघडले नाहीत. १० एप्रिल रोजी अखेर बाळाचा मृत्यू झाला. अंत्यसंस्कारापूर्वी बाळाचे शरीर स्वच्छ करण्यासाठी नेले असता, त्याच्या शरीरात घातलेल्या नळ्या अक्षरशः सडलेल्या अवस्थेत होत्या, असा काळीज पिळवटून टाकणारा आणि धक्कादायक आरोप पीडित मातेने केला आहे. इतकेच नाही तर, या कठीण प्रसंगी रुग्णालय प्रशासनाने सहानुभूती दाखवण्याऐवजी सुरक्षा रक्षकांमार्फत आपल्याला धक्काबुक्की करून बाहेर काढल्याचेही त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केल्यामुळे आता रुग्णालय प्रशासनाकडून आपल्याला धमक्या येत असल्याचा खळबळजनक दावा अर्चना पाटील यांनी केला आहे. आपल्या निष्पाप बाळाला न्याय मिळावा यासाठी त्या अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी सरकारकडे दाद मागत आहेत. या गंभीर आरोपांबाबत वाडिया रुग्णालय प्रशासनाने अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. आता मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्री या संवेदनशील प्रकरणाची दखल घेऊन दोषींवर कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उमरगा शहरात राष्ट्रीय पातळीवरील पब्लिक स्कूल ची सुरुवात



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** येथील भारत शिक्षण संस्था उमरगा संचलित द दिल्ली पब्लिक स्कूल उमरगा यांच्या सौजन्याने पूर्ण सीबीएससी पॅटर्न नुसार नर्सरी ते सातवीपर्यंत अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रवेश शुभारंभानिमित्त भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अश्लेष शिवाजीराव मोरे, सचिव डॉ सुभाष वाघमोडे, प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. जीएस मोरे आणि पब्लिक स्कूल चे प्रतिनिधी श्री रविकांत डोंगरे आदींची उपस्थिती होती . उमरगा शहरात अद्यावत अभ्यासक्रम आणि डिजिटल क्लासरूम द्वारे तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सीबीएससी पॅटर्न आणि मेडिकल इंजिनिअरिंग साठीची तयारी करण्याची संधी भारत शिक्षण संस्था उमरगाच्या वतीने दिली आहे.लहान मुलांच्या कौशल्य विकासासाठी स्वयं अध्ययन प्रात्यक्षिक खेळ क्रीडा सांस्कृतिक कार्यक्रम त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता याची जोड असा हा अभ्यासक्रम उमरग्यातील उमरगा आणि उमरगा परिसरातील मुला मुलींसाठी एक पर्वनीच आहे. असे प्रतिपादन सचिव डॉ सुभाष वाघमोडे यांनी केलेThe Delhi Public School Omerga भारत शिक्षण संस्थेने उमरगा सारख्या अविकसित भागासाठी दिलेली एक मोठी देणगी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर ग्रामीण विद्यार्थ्यांना तयारी करण्याची मोठी संधी. या नवीन शाखेच्या नवीन नोंदणी प्रक्रियेला अमोल शिवाजीराव मोरे, अध्यक्ष, अश्लेष शिवाजीराव मोरे, उपाध्यक्ष, जनार्दन साठे- सरचिटणीस, पद्माकर हराळकर - सचिव, मा. डॉ सुभाष वाघमोडे- सहसचिव सtर्व संचालक मंडळ, सदस्य, भारत शिक्षण संस्था

उमरगा कार्यक्रम त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता याची जोड असा हा अभ्यासक्रम उमरग्यातील उमरगा आणि उमरगा परिसरातील मुला मुलींसाठी एक पर्वनीच आहे. असे प्रतिपादन सचिव डॉ सुभाष वाघमोडे यांनी केले.




बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ एप्रिल २०२६


## आरोपी निदा खानच्या जामिनावर २ मे रोजी निकाल; न्यायालयात सुनावणी पूर्ण



**नाशिक** : येथील TCS मल्टिनॅशनल कंपनीतील धर्मांतरण प्रकरणातील आरोपी निदा खान यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी पूर्ण झाली आहे. न्यायालयाने या प्रकरणातील आपला निकाल राखून ठेवला असून, तो २ मे रोजी दिला जाईल असे म्हटले आहे. ज्या ८ आरोपींविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे, त्यांपैकी निदा खान एक आहे.

निदा खानने न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला आहे. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, तिच्या कुटुंबीयांनी आणि वकिलांनी असा युक्तिवाद केला की, ती केवळ टेलिकॉलर म्हणून नोकरी करत होती आणि एचआर विभागाचा भाग नव्हती. मात्र, निलंबनाच्या पत्रात तिचे पद 'प्रोसेस असोसिएट' असे नमूद आहे.

या वादात आपल्याला विनाकारण ओढले जात असल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे. निदा खानच्या वडिलांनी सांगितले की, त्यांच्या मुलीने काहीही चुकीचे केलेले नाही. ती नेहमीप्रमाणे कार्यालयात गेली आणि तिने लोकांना सामान्यपणे अभिवादन केले. त्यांच्या दाव्यानुसार, यामुळेच ती या वादात अडकली. दरम्यान, तिच्या वकिलांनी न्यायालयाला माहिती दिली की निदा खान गर्भवती आहे, ज्याचा उल्लेख जामीन अर्जात मानवतावादी कारण म्हणूनही करण्यात आला होता.

निदा खानच्या कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, निदा खानच्या कुटुंबाचा मुख्य व्यवसाय मुंबईतील लाकडाचा व्यापार आहे. निदाने गेल्या वर्षी लग्न केले आणि जानेवारी महिन्यात ती आपल्या पतीसोबत मुंबईत स्थायिक झाली. मिळालेल्या माहितीनुसार, ९ एप्रिलपर्यंत ती मुंबईतील मालाड येथील एका बीपीओ कार्यालयात काम करत होती, त्यानंतर तिला निलंबित करण्यात आले.

दरम्यान, निदा खानच्या वकिलाच्या म्हणण्यानुसार, तिची किमान चार महिन्यांपूर्वी मुंबईत बदली झाली असून, तिचे कुटुंब आणि पती सध्या तिथेच राहतात. नाशिकमधील एका बीपीओमधील २३ वर्षीय महिला कर्मचाऱ्याने तक्रार दाखल केल्यावर हा वाद सुरू झाला. तिने तिचा वरिष्ठ सहकारी दानिश शेख याच्यावर लैंगिक छळ केल्याचा आणि लग्नाची खोटी आश्वासने देऊन तिच्यासोबत प्रेमसंबंध ठेवल्याचा आरोप केला. तक्रारीत असेही म्हटले आहे की, दानिश शेख आणि त्याचा दुसरा सहकारी तौसीफ यांनी तिला इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी पटवण्याचा प्रयत्न केला.

## अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण प्रस्ताव रद्द करा : संभाजीनगरमध्ये 'आरक्षण बचाव' कृती समितीचा मोर्चा



**छत्रपती संभाजीनगर** : मध्ये 'आरक्षण बचाव कृती समिती'ने अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रस्ताव रद्द करण्याच्या मागणीसाठी मोर्चा काढला. आमखास मैदानापासून विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात अनुसूचित जातीतील विविध घटक, सामाजिक संघटना, आंबेडकरी कार्यकर्ते आणि सर्वपक्षीय प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचल्यानंतर एका शिष्टमंडळाने आयुक्तांना निवेदन सादर केले. नेत्यांनी यावेळी सरकारवर अनुसूचित जातींमध्ये फूट पाडण्याचा आरोप केला. उपवर्गीकरण रद्द न झाल्यास मंत्रालयावरही मोर्चा काढण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

विभागीय आयुक्तांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात समितीने म्हटले आहे की, अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करणे हे सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांच्या विरोधात आहे. एका घटकाला न्याय देण्याच्या नावाखाली इतरांवर अन्याय करणे स्वीकारार्ह नाही, अशी भूमिका समितीने मांडली.

उपवर्गीकरणासाठी आधार मानल्या जाणाऱ्या अहवालांवरही समितीने आक्षेप नोंदवले. माजी न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही, तसेच या समितीच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता नसल्याचा आरोप करण्यात आला.

यावेळी समितीने काही प्रमुख मागण्या मांडल्या. उपवर्गीकरण हा विषमतेवर उपाय नसून, त्याऐवजी शिक्षण, रोजगार, शिष्यवृत्ती आणि कौशल्य विकासाच्या प्रभावी योजना राबवाव्यात. तसेच, अनुसूचित जातीच्या आरक्षणाची मर्यादा १३ टक्क्यांवरून २० टक्के करावी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुरेशी वसतिगृहे व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

घाईघाईने आणि अपुऱ्या माहितीच्या आधारावर उपवर्गीकरणाचा निर्णय लादल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा 'आरक्षण बचाव कृती समिती'ने दिला आहे. हा लढा केवळ आरक्षणासाठी नसून स्वाभिमान आणि सामाजिक न्याय टिकवण्यासाठी असल्याचे समितीने स्पष्ट केले. हा मोर्चा शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

## जगण्यास अर्थ

विद्या विना नाही,समाजात मान
विद्या नसल्यामुळे, होते अपमान १

विद्या विना सारे,दु:खाचेच वारे,
शिक्षण घेताच. उघडती दारे. २

विद्येमुळे आले,जगण्यास अर्थ
नाहीतर सारे,जीवनाच व्यर्थ. ३

विद्या विनयेन, शोभून दिसते
विद्या मिळताच, आनंद वसते.४

विद्येमुळे येते,जीवनी प्रकाश
यशस्वी होताच,ठेंगणे आकाश.५

विद्येमुळे मिळे,जीवनास गती
होणारच नाही,भ्रष्ट कधी मती. ६

विद्येचा असावा,सार्थ अभिमान
बाळगावा,नित्य स्वाभिमान. ७

विद्या विनयेन,सदैव मिळते
गरिबी कायम,दूरच पळते. ८

ज्ञानामुळे सर्व,ज्ञानबोध होई
अज्ञानाचे मूळ,करपून जाई. ९

विद्येचे करावे,सर्वांनी आदर
योग्य वेळी ज्ञान,करावे सादर.१०



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## जंगलात उन्ह

जंगलात वाढलाय
उन्हाचा पारा
घामाघूम पशू पक्षी
सुटत नव्हता वारा

कोकिळेने घातला मग
सुती पांढरा गाऊन
तृप्त झाला माकड
लिंबू शरबत पिऊन

पळत जाऊन कोल्ह्याने
दुकानातून आणली छत्री
उन्हापासून सुटका मिळेल
मनात त्याच्या खात्री

ऊसाचा रस पिण्याची
लांडग्याला सुटली हाव
दह्याच्या लस्सीवर
उंटाने मारला ताव

उकाड्याला कंटाळून
हत्तीने गाठले तळे
थंडावा मिळण्यासाठी
रान म्हैस चिखलात लोळे

सशाला तरतरी आली
नारळाचे पाणी पिऊन
गाढव गाढ झोपला
कोवळ्या काकड्या
खाऊन

अंगाची लाही लाही
झाल्याने
वाघोबा डरकाळी फोडे
हरीण हवा घालीत
भीतीने बसला पुढे

उष्माघात झाल्याने
सिंह लागला लोळू
त्याच्या गर्जनेने
पशू पक्षी लागले पळू



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |